Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

NEP 2020 नुसार 21 व्या शतकातील जागतिक कौशल्ये प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक करताना येणा–या समस्यांचा चिकित्सक अभ्यास

संशोधकाचे नाव
श्री.दिपक नारायण घाडगे
मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
अभ्यासकेंद्र येवला 54499

मार्गदर्शकाचे नाव
प्रा. डॉ. संतोष रुकारी
एम्.ए, एम्.एड, सेट, पीएच.डी.
मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
अभ्यासकेंद्र येवला 54499

1. *सारांश–*

शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे, चारित्र्य निर्मितीचे, सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, हा विचार आपल्या ऋषिमुनींनी दिलेला आहे. आधुनिक काळातही स्वामी विवेकानंदानी 'मनुष्यत्व निर्माण करणे हेच शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे' किंवा 'शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे, त्याचे प्रकटीकरण असते' किंवा 'शिक्षण म्हणजे डोक्यात सतत धुडगूस घालणाया माहितीचे भेंडोळे नसून, शीलवान, चारित्र्यवान माणसे घडवण्याचे ते एक प्रभावी साधन आहे' असा मौलिक विचार त्यांनी मांडला आहे. 'शिक्षण म्हणजे सुसंस्काराचे दान आहे असे आचार्य विनोबा भावेनी सांगितलंय. आपल्या देशातील शिक्षणचिंतकांनी हाच विचार वेगवेगळ्या शब्दांत मांडला आहे. परंतु शिक्षण हे अर्थार्जनाचे साधन आहे, हा व्यावहारिक विचार जेव्हा पूर्वसूरींच्या विचारांवर आरूढ झाला, तेव्हाच शैक्षणिक कौशल्यांच्या महामार्गाचे खोदकाम सुरू झाले. यामुळे 21 व्या शतकातील आवश्यक जीवन कौशलयांची रुजवणूक होणे गरजेचे आहे.

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at *http://www.goeiirj.com*

2. **महत्त्वाचे शब्द** – 21 व्या शतकातील जागतिक कौशल्य

3. **संशोधन लेखाचा मुख्य भाग –**

3.1 **संशोधन समस्या विधान –**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाडेवस्ती, केंद्र नगरसूल, ता येवला जि नाशिक येथील NEP 2020 नुसार 21 व्या शतकातील जागतिक कौशल्ये प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये रुजवणूक

करताना येणा–या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि उपाय योजना सुचविणे

3.2 उद्दिष्टे –

1. NEP 2020 च्या शैक्षणिक धोरणातील जागतिक कौशल्यांचा अभ्यास करणे
2. सदर कौशल्य विद्यार्थ्यात रुजवत असताना शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे
3. सदर समस्या दूर करण्यासाठी उपाय योजना सुचविणे

3.3 संशोधन प्रश्न –

प्राथमिक शाळांमधील 21 व्या शतकातील जागतिक कौशल्ये प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये रुजवणूक करताना येणाऱ्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करता येतो का ?

3.4 गृहीतके –

1. प्राथमिक स्तरासाठी विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारचे कौशल्य राबविता येतात
2. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्य शिकवली जातात
3. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना गणितीय कौशल्य शिकवली जातात .

4 प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रायोगिक कौशल्य शारीरिक कौशल्य शिकवली जातात

3.5 व्याप्ती व मर्यादा –

सदर संशोधन हे येवला तालुक्यातील नगरसुल केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठीच लागू आहे.

3.5.1 मर्यादा–

1. प्रस्तुत संशोधन हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाडेवस्ती, केंद्र नगरसूल पुरतेच मर्यादित आहे
2. सदर संशोधन हे शैक्षणिक वर्ष 2024 ते 25 या कालावधीसाठी असेल.

3.6 संशोधन पद्धती –

3.6.1 जनसंख्या व नमुना निवड–

अ) जनसंख्या–

येवला तालुक्यातील नगरसुल केंद्रातील दहा प्राथमिक शाळा

नमुना निवड करण्याची पद्धती – सहेतुक नमुना निवड पद्धती

नमुना निवड – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाडेवस्ती, केंद्र नगरसूल, येथील 10 प्राथमिक शाळेतील 30 शिक्षक हा प्रस्तुत संशोधनाचा न्यादर्श आहे.

ब) माहिती संकलनाची साधने–

प्रस्तुत संशोधनासाठी शिक्षक प्रश्नावलीचा वापर केला आहे. सदर प्रश्नावली मध्ये एकूण 90

प्रश्न आहेत. शिक्षकांना 21 व्या शतकातील जागतिक कौशल्य रुजवताना कोणत्या अडचणी येतात ते जाणून घेण्याच्या उद्दिष्टाने सदर प्रश्नांची आखणी केलेली आहे.

3.6.2 माहिती विश्लेषणाची तंत्र –

प्रस्तुत संशोधनातून प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान आणि प्रमाण विचलन या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात येईल

3.7 निष्कर्ष –

१) 21 व्या शतकातील जागतिक कौशल्य रुजवताना येणाऱ्या समस्येचा चिकित्सक अभ्यास केल्यामुळे समस्येच्या विविध कारणांचा शोध लागला आहे.

२) सदर संशोधनातून ग्रामीण भागातच जागतिक कौशल्य रुजवताना येणा–या समस्या सर्वाधिक आहे हे लक्षात आले आहे.

३) विद्यार्थ्यांचे जागतिकीकरण होण्यासाठी जागतिक कौशल्य रुजवनुक करणे काळाची गरज आहे.

4) जागतिक कौशल्य रुजवताना येणा–या समस्या कायमची सोडवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमाची गरज आहे.

3.8 संदर्भसूची

१) बापट भा. गो.(१९७५) शैक्षणिक संशोधन. पुणे, नूतन प्रकाशन

२) भिंताडे वि.रा. (१९९४) शैक्षणिक संशोधन पद्धती पुणे नूतन प्रकाशन

३) मुळे रा.श. आणि उमाठे, वि. तू.(१९७७) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे. नागपूर विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ

Website

1) http://shodhganga.inflibnet.ac.in.

2) www.eric.com.

3) http://en.wikipedia.org.